# प्रतिसाद

जूनचा 'कमला निंबकर बालभवन' या शाळेविषयीचा विशेष अंक खूपच छान झालाय. मला फार आवडला. मॅक्सिनमावशी, मंजिरीताईंच्या शाळेविषयी खूपच उत्सुकता होती आणि एकदा तिथे जायची इच्छाही होती. आता अंक वाचून ती उत्सुकता, इच्छा अधिकच प्रबळ झाली आहे.

पालकनीतीचा अंक आला की शब्दबिंब हे सदर मी उत्सुकतेने सर्वात आधी वाचते. डेक्कन कॉलेजमध्ये मी अमेरिकन विद्यार्थ्यांना मराठी शिकवते. त्या दृष्टीनेही मला हे लेख उपयुक्त वाटतात.

**सुजाता महाजन**, पुणे.

जूनचा अंक खूपच आवडला. बालकेंद्री, नवोपक्रमी अशा कमला निंबकर बालभवनबद्दल भरभरून आणि यथायोग्य लिहिलं आहे, याचा प्रत्यय संपूर्ण अंक वाचताना येतो. फलटणला जाऊन ही बिनघंटेची तगडी शाळा अनुभवावी, मंजूताई, मॅक्सिनमावशींना भेटावं असं तीव्रतेनं वाटलं.

पंचवीस वर्षांपूर्वी फलटणमध्ये मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या ह्या शाळेची उभारणी करणाऱ्या भाषावैज्ञानिक मॅक्सिनमावशी द्रष्ट्या खऱ्याच !

शाळेला नावीन्याचा ध्यास आहे, प्रत्येक मुलाला समजावं अशी आस आहे, आणि आज २५ वर्षे या तत्त्वांची कास धरलेली आहे, हे मंजूताईंच्या लेखातून प्रत्ययाला येतं. तर नादियाच्या लेखातून कमलाबाई निंबकरांच्या शिक्षणक्षेत्रातल्या मूलभूत कामाची ओळख होते. माजी विद्यार्थ्यांचे लेख तर अप्रतिम आहेत. पालकनीतीमध्ये पूर्वी छापून आलेलं याच शाळेतल्या मुलांचं लिखाण मला या निमित्तानं आठवलं, प्रकाश अनभुलेंची 'बा म्हन्तु' ही कविता आठवली.

आणखी एक, शब्दबिंब या सदरामधून शब्दांचा घेतलेला धांडोळा मला आवडतो. एका शब्दाचे किती वेगवेगळे अर्थ असतात! सध्या वापरात नसलेले शब्द, एके काळी प्रचारात होते, त्यांची आणि त्याबरोबर ते उपयोगात आणणाऱ्या घरातल्या, आजूबाजूच्या लोकांचीही आठवण या निमित्तानं येते.

**प्रेरणा खरे**, बदलापूर

# या अंकात


► *माझं काम माझं पालकपण – लेखांक – ७*

**पालकत्वाचा परीघ विस्तारताना –** वसंत देशपांडे

प्रत्येकाच्याच आयुष्यात कधी ना कधी काही वेगळं घडत असतं. सार्वजनिक तसंच व्यक्तिगत जीवनातही. त्या अनुभवांना भिडण्याची प्रत्येकाची ताकद, क्षमता आणि इच्छा मात्र वेगवेगळी असते. काही थोडे जण अशा काही ताकदीनं त्याला सामोरं जातात की त्यातून एक वेगळं काम उभं राहतं. कधी स्वतःच्या व्यक्तिगत दुःखांच्या पलीकडे जाऊन अनेकांच्या दुःखावर केवळ फुंकर घालण्याचं नव्हे, तर एक आश्वासक हात पुढं करण्याचं मोलाचं काम ते करतात. वसंत देशपांडे सर त्यांपैकीच एक. त्यांच्या पालकत्वाचा परीघ विस्तारणाऱ्या त्यांच्या वाटचालीविषयी.

► **मुलांना रस वाटेल असं थोडंसंच काहीतरी...** – मधुरा मणेर

ह्या लेखातला तास इंग्रजीचा आहे, सामान्य ज्ञानाचा, का चित्रकलेचा? विषयांच्यामध्ये काटेकोर कुंपणं नसली आणि शिक्षक कल्पक असला की मुलं मजेमजेत शिकतात. अभ्यासाचं ओझं होत नाही की मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद मावळत नाही.

► **जनसंवाद शिक्षणहक्काचा –** पूजा करंजे

शिक्षणहक्क कायद्यानुसार सामाजिकदृष्ट्या वंचित गटातील मुलांसाठी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवणं अनिवार्य आहे. शिकण्या – शिकवण्याच्या प्रक्रियेचे नवे आयाम खुले होण्याची संधी देणाऱ्या या तरतुदीबाबतची वस्तुस्थिती काय आहे, शाळा–व्यवस्थापनं, अधिकारी याकडे कसं बघताहेत, याविषयीच्या बैठकीचा हा अहवाल आहे.

► **मुलांच्या मुक्त अभिव्यक्तीसाठी – फ्रीडम वॉल**

– स्मिता गालफाडे

► **शब्दबिंब –**

तुपात तळलेल्या, साखरेत घोळलेल्या काही शब्दांविषयी.



संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे–४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे–४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

**पा ल क नी ती**

**पालकत्वाला वाहिलेले मासिक**

**संपादक**

संजीवनी कुलकर्णी

**संपादक मंडळ**

- नीलिमा सहस्रबुद्धे
- वंदना कुलकर्णी
- प्रियंवदा बारभाई
- शुभदा जोशी

**मुखपृष्ठ–मांडणी**

रमाकांत धनोकर

**अक्षरजुळणी**

अभय ढमढेरे

**वार्षिक वर्गणी रु.२००**

**आजीव वर्गणी रु.२५००**

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट **'पालकनीती परिवार'** या नावाने काढावा.



संपर्क :

**पालकनीती परिवार,**

अमृता क्लिनिक,

संभाजी पूल कोपरा,

कर्वे रस्ता, पुणे – ४११००४.

✆ –०२०–२५४४१२३०, २५६७३५९६

**palakneeti@gmail.com**

**www.palakneeti.org**



**पालकनीती परिवाराचे प्रकाशन**

वर्ष **१३ वे** अंक **६ वा**

**१६ सप्टेंबर २०१३**

लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

# संपादकीय

डॉक्टर नरेंद्र अच्युत दाभोलकर ह्यांची पुण्यात हत्या झाली. सकाळी फिरायला गेलेल्या दाभोलकरांना कुणी अज्ञात माणसानं गोळ्या घातल्या. दाभोलकरांसारख्या विचारांवर वाढलेल्या-पोसलेल्या माणसाला मरणाचं भय नव्हतं, देऊ केलेली सुरक्षाव्यवस्थाही त्यांनी नाकारलेली होती. मुद्दा मृत्यूचा नाहीच आहे. जन्मभर ज्वलंत विचारांचा शांतपणानं पाठपुरावा करणाऱ्या दाभोलकरांसारख्या माणसाला कुणी अविचारीपणानं मारतं; हे महाराष्ट्राला अत्यंत लांछनास्पद आहे. राजकीय हत्या महाराष्ट्रात अनेकदा घडलेल्या आहेत. जीवनावर प्रेम नसलं की ती पोकळी भरून काढायला सत्ता, दहशत, धर्म, अंधश्रद्धा अशा बाबींची लोकांना गरज पडते. ही गरज पडण्यामागचं मूळ कारण, मनातली असुरक्षितता असते. दाभोलकरांसारख्यांच्या निखळ माणूसपणाची आणि विज्ञानवादाची अशा लोकांना भीती वाटते.

दाभोलकर अगदी साधेपणानं, अनाक्रमक मार्गानं पण ठामपणानं आपलं म्हणणं मांडत असत, आणि त्याचमुळे त्यांच्या विचारांना विचारांनी विरोध करणं न साधलेल्यांनी विकारी वृत्तीनं त्यांच्यावर हल्ला केला. आजच्या काळात समाजवृत्तीला आव्हान देणाऱ्या कुठल्याही कार्यकर्त्याला कष्टांची पराकाष्ठा करावी लागते. दाभोलकरांचा स्वभाव त्याबद्दल निराश होण्याचा नव्हता. आपल्या मिष्कील मुद्रेनं नर्मविनोदी स्वभावानं ते परिस्थितीचा आपला आपला अर्थ लावत असावेत. 'आपण प्रयत्न करत राहायचं, मोठे बदल काही सहज घडत नाहीत, पण काही ना काही घडतंच.' अशी शांत सकारात्मक वृत्ती त्यांच्याकडे असल्याचं त्यांना जवळून ओळखणारी माणसं म्हणतात. ही वृत्ती कुठल्याही अजाण निरागसतेतून नाही, तर परिस्थितीचा नेमका अंदाज असण्यातूनच निर्माण झालेली होती. बदल घडवण्यासाठी अपार प्रयत्न करावे लागणं आणि प्रयत्न करणाऱ्याला सहज मारून टाकलं जाणं या घटनांमधली दरी खचितच विषण्ण करून सोडणारी आहे.

एखादा माणूस जातो, तेव्हा त्याच्या प्रियजनांना आपला सखा सोबती हरपल्याचं दुःख होतंच. दाभोलकरांना ओळखणारी, त्यांच्यासह काम केलेली, त्यांच्याबद्दल कमालीचा आदर बाळगणारी अक्षरशः लक्षावधी माणसं महाराष्ट्रात आहेत, त्या सर्वांना या घटनेनं कमालीचं दुःख झालं. त्याच संध्याकाळी ठिकठिकाणी उत्स्फूर्तपणे सभांचं आयोजन केलं गेलं.

आता या घटनेला दोन आठवडे झाले तरी दाभोलकरांचा खून कुणी केला हे सापडलेलं नाही. प्रत्यक्ष खून कुणी केला ते सापडेलही कदाचित, पण ह्यामागे असलेल्या वृत्तीला नाहीसं करायला हवं, ते फार अवघड आहे. भीतीतून निर्माण झालेल्या दुष्टपणानं जेव्हा कुणी दुसऱ्या माणसाला मारतं तेव्हा ते स्वतःतल्या माणूसपणाचाच खून करत असतं, त्यामुळे त्यातून ते करणाऱ्यांना जे साधायची इच्छा असते ते कधीच साधत नाही. पुण्यातल्या एका सभेत संपूर्ण वेळ मंचावर अनेक तरुण मुलंमुली काळ्या रंगाचे निषेध फलक घेऊन उभी होती. लांछनास्पद कृत्याचा धिक्कार त्या काळ्या रंगावर उमटलेला होता. त्यातल्या एका फलकावर लिहीलेलं होतं - 'आम्ही सगळे दाभोलकर'. दाभोलकरांना मारून टाकणाऱ्यांनी हा फलक आवर्जून बघायला हवा. त्या साध्या तीन शब्दांच्या वाक्यात बराच मोठा अर्थ साठवलेला होता.

स्वतःच्याच भयगंडात थरथरत विखारी हिंसेचा आधार घेणाऱ्यांना समजायला हवं की दाभोलकरांसारखी माणसं जिवंत रूपातला विचार असतात, आणि माणूस मारून तो विचार मरत नाही. एका दाभोलकराना मारलंत, तर शेकडो दाभोलकर त्यातल्या विचारांचा एक थेंबही न सांडू देता तयारीनं उभे आहेत, आणि राहतील.

या घटनेचा सरळसरळ संशय असलेली संस्था केलेल्या 'कर्माचे फळ माणसाला भोगावेच लागते' असं उद्दामपणे म्हणते. आता येणारा काळ एकंदरीनंच कठीण असणार आहे. शासन हात बांधून बसणार, राजकीय नेत्यांना काहीच सुचत नसल्यानं ते बाबा-माता-बापू-महाराजांच्या पायी नतमस्तक होणार, आणि धर्मांध शक्ती मोकाट सुटणार.

दाभोलकरांसारखा माणूस मरतो तेव्हा व्यक्तीच्या वियोगाचं दुःख असतंच, त्यात इथं नुसतं दुःख नव्हतं, त्यात क्षोभ होता, मारणाऱ्यांच्या बौद्धिक-मानसिक कमतरतेची कीव होती. वैचारिक मतभिन्नता असण्यात, अगदी गंभीर मतभेद असण्यात काहीच गैर नाही. दाभोलकरांची संस्कृती तर आपल्या संपूर्ण विरोधी मत मांडणाऱ्याला, ते मांडण्याची संधी मिळावी म्हणून प्रसंगी स्वतःचं शिर कापून ठेवणारी होती. त्यांना मारू बघणाऱ्यानं आपल्या कृतीचं कारण त्यांच्यासमोर ठेवलं असतं तर दाभोलकरांनी त्याच्या विचारवृत्तीला जाग आणवायचा प्रयत्न खचितच केला असता. याच पुण्यात सुमारे दीडशे वर्षांपूर्वी महात्मा फुल्यांना संपवून टाकायला आलेल्या मारेकऱ्यांना 'आपण वागतो आहोत ते गैर आहे,' याची जाणीव ज्योतिबांनी करून दिली होती. फुल्यांना न मारताच, त्यांना नमस्कार करून ते मारेकरी परत गेले होते. कुणीतरी सांगितलं म्हणून विचारहीनपणे त्यांनी फुल्यांना मारलेलं नव्हतं. आता इतक्या वर्षांनंतर हे मारेकरी मात्र आपण काय करतो आहोत, ह्याचा विचार करत क्षणभरासाठी थांबत नाहीत, याचं दुःख फार मोठं आहे.

दाभोलकरांना मोबाईलवर 'आम्ही गांधीजींचं काय केलं आठवतंय ना', असा एक संदेश आल्याचं कळतं; इतक्या वर्षात या अतिरेकी वृत्तींना कळत कसं नाही, की काळ कितीही वाईट आला तरी विज्ञानाच्या वेदीवर ठामपणे उभे असलेले भद्र विचार तलवारींना, बंदुकीच्या गोळ्यांना, कधीच घाबरत नाहीत.



# पालकत्वाचा परीघ विस्तारताना

**वसंत देशपांडे**

सत्तरचं दशक होतं. १९७२ साली भीषण दुष्काळ पडलेला होता. त्याचे ग्रामीण समाजाला बसणारे चटके वृत्तपत्रांतून आमच्यापर्यंत पोचत होते. आणि मन अस्वस्थ होत होतं. सांगली जिल्ह्यातला रामापूर, कमलापूर, बलवडी, खानापूर हा भाग म्हणजे पर्जन्यछायेतला प्रदेश. त्यामुळे तो कायमचा दुष्काळी भाग. पण ७२ च्या दुष्काळानं लोकांच्या तोंडचं पाणी पळालं होतं. जगणं मुष्कील केलं होतं. त्यावेळी मी सांगलीतल्या विलिंग्डन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झालेलो होतो. दुष्काळाचं वास्तव माझ्या फार जवळ होतं. त्याच दरम्यान मुंबईच्या 'चर्च ऑक्झिलरी फॉर सोशल ॲक्शन' या संस्थेकडून - सांगली जिल्ह्यातल्या दुष्काळग्रस्तांसाठी काम करण्याचा प्रस्ताव आला आणि माझ्या अस्वस्थतेला वाट मिळाली. माझ्याबरोबर माझ्याइतकेच अस्वस्थ झालेले माझे महाविद्यालयातील एक सहकारी प्रा. अरुण चव्हाण आणि मी या कामात सहभागी झालो.

लोकांसाठी दुष्काळी कामं काढणं, त्यांना धान्य, तेल या रूपात मजुरी देणं असं त्या कामाचं स्वरूप होतं. नंतर त्यातूनच 'येरळा प्रॉजेक्ट सोसायटी'चं काम उभं राहिलं.

आज, चाळीस वर्षानंतर ह्या घटनेकडं आणि एकूणच चाळीस वर्षांच्या प्रवासाकडं बघताना अनेक प्रश्न पडतात. सामाजिक कामाकडं मी का ओढला गेलो?... घरात अकरा भावंडांच्या गरीब कुटुंबांत वाढताना, हलाखीला सामोरं जातानाचे अनुभव डोळ्यांसमोर होते, म्हणून? का, त्यातही - त्या हलाखीला तोंड देत आपली सहृदयता सांभाळणारी, गरिबांना अडीअडचणीला मदत करणारी आई आठवत होती म्हणून? की व्यक्तिगत आयुष्यात एकीकडं वैवाहिक, कौटुंबिक आयुष्य जगत होतो आणि दुसरीकडं प्राध्यापकाच्या 'बुद्धिजीवी' पेशातून पुस्तकं, विद्यार्थी यातलं समाधान लाभत होतं... पण 'ह्या' आयुष्याच्या दोन्ही बाजूंच्या मर्यादाही जाणवत होत्या, मनाला अस्वस्थ करत होत्या म्हणून? एकीकडं इंग्रजी साहित्याचा विद्यार्थी आणि प्राध्यापक ह्या भूमिकांतून इंग्रजी साहित्यानं उघडलेली कवाडं, दिलेली संवेदनशीलता मनाला अस्वस्थ करत असावी. आणि व्यक्तिगत आणि व्यावसायिक अशा दोन्ही छोट्या चौकटीतून बाहेर पडण्यासाठी ती साद घालत असावी...

नाहीतर, सामाजिक कामाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना, मी 'त्या' कामाकडं का ओढला गेलो असेन?

## सुरुवातीचे संमिश्र अनुभव

दुष्काळग्रस्तांच्या मदतीचं काम चालू असतानाच ग्रामीण जीवनाबद्दल, शेती व्यवसायाबद्दल विचार सुरू झाला. दुष्काळाची परिस्थिती काळानुरूप बदलल्यावर अनेक प्रश्न शिल्लक राहणारच आहेत, त्या प्रश्नांकडं आपल्याला प्रकल्प संपला म्हणून पाठ फिरवता येणार नाही, याचंही भान आलं. पण ग्रामीण भागात काम करण्यात अनेक अडथळे होते. मी कानडी भाषक असणं हा केवळ भाषिक दुराव्याचा मुद्दा नव्हता, तर गावकरी आणि आमच्यात अंतर निर्माण करणारा होता. तसाच दुसरा अडथळा जातीचाही होता. त्यामुळं, आमच्या सहकार्याला सहजतेनं सामोरं जाणं तिथल्या स्थानिक लोकांना सुरुवातीला जड गेलं असावं. मानवी स्वभावाच्या (त्यात स्वतःलाही गृहीत धरून) मर्यादा, खानापूर कार्यक्षेत्रातील भौगोलिक, नैसर्गिक आणि सांस्कृतिक - सामाजिक वैशिष्ट्यं यांचं भान ठेवून, काम करत राहायचं हे मी मनाशी पक्कं ठरवलं. आम्हाला साथ देणाऱ्यांमध्ये गेली चाळीस वर्षं अखंडपणे सोबत करणारे भीमराव पाटील (तात्या) आणि ज्ञा. तु. गायकवाड (अण्णा) यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

## 'येरळा प्रॉजेक्टस् सोसायटी'चा जन्म

१९७५ साली 'वेरळा डेअरी प्रॉजेक्ट' या नावानं संस्थेचं काम सुरू झालं. बारा महिने जगता येईल असं उत्पन्न शेती देत नव्हती. म्हणून

गुजराथेतला आणंदचा आदर्श घेऊन डेअरी – दुग्धउत्पादन प्रकल्प सुरू केला.

कामास सुरुवात केली तेव्हा वेगवेगळ्या विचारसरणींचं वाचन झालं होतं. पण जगताना, मानवी स्वभाव जाणून घेताना जीवनाची गुंतागुंत समोर येत होती. त्यामुळं कुठल्याही एका विचारसरणीचा आग्रह, अभिनिवेश बाळगून प्रश्न सुटणार नाहीत, तसा प्रयत्नही करू नये, हा विचार मनात ठाम होता. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत, प्राध्यापकी जीवनातला कामाचा व्याप, जबाबदाऱ्या यांचं भान बाळगत ग्रामीण जीवन, तिथले प्रश्न, लोकांचे स्वभाव – तिथल्या समूहाचं मानसशास्त्र समजावून घेत प्रवास सुरू झाला.

'येरळा' हे नावंही तिथल्या नदीचं ! 'वेरळा' हे मूळ नाव – ग्रामीण भागात ते 'येरळा' म्हणूनच प्रचलित आहे. १९८० साली 'येरळा प्रॉजेक्टस् सोसायटी' असं संस्थेचं नामकरण हेतूतः करण्यात आलं. शेती, दुग्धव्यवसाय यापेक्षा अधिक व्यापक अधिष्ठान कामाला मिळावं, ते ग्रामविकासाचं काम व्हावं हा त्यामागचा उद्देश होता.

## आर्थिक पायाभरणीचा प्रयत्न

संस्थेच्या कामाची सुरुवात तिथल्या ग्रामस्थांच्या आर्थिक प्रश्नांना घेऊनच झाली. खानापूर तालुक्यातल्या पश्चिम भागातली २० गावं हे संस्थेचे कार्यक्षेत्र !

डेअरीच्या आधी कामाला सुरुवात झाली ती शेती किफायतशीर कशी होईल, याच प्रश्नानं. त्यासाठी संस्थेमार्फत पाणी अडवण्याच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला. जमीन समतल करून घेणं, वेगवेगळया पिकांसाठी शेतकऱ्यांसोबत काम करणं, दुष्काळावर मात करता करता शेती व्यवसायात नवीन संसाधनांची भर घालणं, प्रयोग करणं, जुन्या अयोग्य समजुतींना बाजूला सारण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करणं यावर भर देण्यात आला. संस्थेनं स्वतः अनेक प्रयोग केले, गांडूळ खतापासून फळबागांपर्यंत ! नंतर संस्थेनं स्वतःची एक नर्सरी काढली. भवतालच्या लोकांना व्यवसायाची संधी दिली.



या कामात ग्रामीण बायकांना सामावून घेणं, त्यांच्या हातात आर्थिक सूत्राचा किमान एक तरी धागा देणं याचं महत्त्व जाणवत होतं. त्याच दरम्यान, माझ्या माजी विद्यार्थिनी श्रीमती विजयाताई कुलकर्णी संस्थेच्या कामात रुजू झाल्या आणि ती जबाबदारी त्यांनी घेतली. तो काळ वेगळाच होता. त्यावेळी गावातल्या महिला घराच्या बाहेर पडत नव्हत्या. ग्रामपंचायतीपुढून जात नव्हत्या. जायचं झालं किंवा जावं लागलंच तर चप्पल काढून हातात धरून जायच्या. एवढंच नव्हे तर, तोंडाभोवती 'परताळा' गुंडाळून (तोंड झाकण्यासाठी वापरण्यात येणारं कापड) जायच्या. या महिलांसाठी आम्ही हळूहळू ग्रामपंचायतीतच बैठका आयोजित करायला लागलो आणि बायका बैठकीला यायला लागल्या, बोलायला लागल्या, आपली मतं मांडायला लागल्या. हा प्रवास सोपा नव्हता पण समाधान देणारा निश्चित होता.

ग्रामीण महिलांच्या उत्पन्नासाठी तेरा हजार पक्ष्यांची – कोंबड्यांची पोल्ट्री हा संस्थेचा खास उपक्रम ! महिलांना बचत करता यावी, कर्ज मिळावं यासाठी संस्थेनं पतपेढ्यांची निर्मिती केली आणि सक्रिय सहभागाला महत्त्वाचं मानून, संस्थेनं त्या दिशेनं नेहमीच प्रयत्न केले. आर्थिक सबलीकरणाचा टप्पा पार केल्यावर, इतर बाबतीत महिलांचा 'आवाज' घरात, गावात आपोआपच ऐकू येऊ लागला.

'येरळा प्रॉजेक्टस्' बाबतचा कामाचा प्रवास – पुरुष (शेतकरी) – महिला – मुलं असा झाला. 'ख्रिश्चन चिल्ड्रेन्स फंड' ह्या संस्थेच्या मदतीनं, संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ५०० मुलांचं पालकत्व संस्थेनं घेतलं. मुलांसाठी बालवाड्या सुरू केल्या. तेव्हा ही संकल्पनादेखील नवी होती. त्यासाठी गावातल्याच महिलांना प्रशिक्षण दिलं. मुलांचं आरोग्य, शिक्षण, व्यक्तिमत्त्वविकास ह्या पातळ्यांवरचा विचार करताकरता ते काम कौटुंबिक स्तरापर्यंत गेलं. आज त्यातली काही मुलं वेगवेगळ्या क्षेत्रात चमकताना दिसतात, तेव्हा समाधान वाटतं.

## लोकसहभागातून उभं राहिलेलं 'आपलं घर'

एकदा शासकीय मदतीबाबत भ्रमनिरास झाल्यानंतर पैशाची उभारणी करण्यासाठी काय करायचं – असा प्रश्न आला तेव्हा अनेक पाश्चात्य संस्थांनी मदतीचा हात पुढं केला. आपल्याला काय करायचं हे स्पष्ट असेल, त्याची मांडणी – मर्यादांसहित केली, कामाची दिशा – पद्धत याबाबत मतभिन्नता असेल तर तेही मोकळेपणानं मांडलं, तर लोकशाही पद्धतीचा मार्ग पाश्चात्य देणगीदार संस्था स्वीकारतात

असा आमचा अनुभव आहे. आपल्याकडून आर्थिक व्यवहाराबाबत पूर्णतः पारदर्शीपणा असेल, तर आपल्या प्रकल्पाच्या अपयशांतील कार्यकारणभावही ते समजून घेतात आणि त्यातल्या यशाची आवर्जून (योग्य पद्धतीनं मोजमाप करून) नोंद करतात, असंही दिसतं.

तर, ह्या पार्श्वभूमीवर 'Deswos' ह्या जर्मन देणगीदार संस्थेच्या सहकार्यानं उभारलेला 'घर निर्मिती प्रकल्प' आला – उभारला गेला. यात संबंधित लाभार्थींनी आणि संस्थेनं अनुक्रमे ६५ टक्के आणि ३५ टक्के अशा पद्धतीचं योगदान दिलं आणि गरिबांसाठीच्या घर – प्रकल्पाची निर्मिती झाली. मदत दिली गेली तीही घरबांधणीसाठी लागणाऱ्या सामानाच्या रूपानं. स्थानिक साहित्याच्या वापरावर भर दिला गेला. निर्धूर चूल बसवण्यासारख्या अटीही त्यात घातल्या गेल्या. अशी ९००च्या आसपास घरं बांधली. एका वेगळ्याच पद्धतीनं संस्था आणि लाभार्थी ह्यांचं नातं प्रगल्भ झाल्याचा अनुभव आम्हाला घेता आला. ह्या घरांच्या प्रकल्पावर 'House for a life time' हा लघुपट तयार करण्यात आला होता आणि जर्मन दूतावासाच्या कार्यालयात अजूनही एका उल्लेखनीय प्रकल्पावरील लघुपट म्हणून तो नेहमी दाखवला जातो.

अंधश्रद्धा – निर्मूलन, जटा – निर्मूलन यांच्यासारख्या प्रबोधनात्मक प्रश्नांवरही संस्थेनं काम केलं. हे तर खूप चिकाटीचं काम. वर्षभर काम केल्यावर फक्त एकच बाई जटा काढायला तयार झाली. त्यानंतर मात्र जटा राखणाऱ्या स्त्रियांचं प्रमाण कमी झालं. लोकांना सकस आयुष्य जगता यावं. यासाठी आहार, आरोग्य या प्रश्नांवरही संस्थेनं खूप काम केलं.

## दयाचा आजार : हादरवून टाकणारी घटना

एरवी व्यक्तिगत आयुष्याबद्दल, व्यक्तिगत भावनांबद्दल, नातेसंबंधांबद्दल बोलणं मला नेहमीच अवघड वाटत आलंय. पण दयाच्या – माझ्या दुसऱ्या क्रमांकाच्या मुलीच्या आजारानं – माझ्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनातली सीमारेषा पुसून टाकली. जे काम समाजातल्या वंचित गटाच्या विकासासाठी करत होतो, त्या कामानंच दयाच्या प्रश्नाबाबत वेगळा विचार करायला लावला. तोपर्यंत वडील म्हणूनचं माझं पालकत्व फारसं वेगळं नव्हतंच, असं म्हणायला हवं. माझं कॉलेज आणि माझं संस्थेचं काम यात मी बुडालेला असे. घरात सतत येणाऱ्या – जाणाऱ्यांची वर्दळ असे. मुलं त्यात वाढत होती. मला चार मुली आणि एक मुलगा. घरची जबाबदारी मुख्यतः माझ्या पत्नीवरच होती.

दया एम्.कॉम्. करत असताना तिला 'एन्केफलायटिस्' झाला आणि बघता बघता, तिनं आपल्या अनेक प्रकारच्या शारीरिक शक्ती गमावल्या. 'अण्णा' आणि 'अव्वा' ('आई'साठीचं कानडी संबोधन) एवढीच आम्हा दोघांना संबोधण्याइतकी तिची अभिव्यक्ती शिल्लक राहिली. मतिमंदत्वाची काही लक्षणं जाणवायला लागली. लिहायला, वाचायला येईना. शरीराला काही वेळा झटके यायला लागले. सुरुवातीच्या काळात तर ती तीन महिने औषधोपचारांसाठी हॉस्पिटलमध्ये होती. आमच्या कुटुंबावर हा फार मोठा आघात होता. अनेक प्रयत्न करूनही 'ती पूर्वीसारखी होणार नाही' हे तज्ज्ञांनी सांगितलेलं वास्तव होतं. ते स्वीकारणं सुरुवातीला आम्हा सर्वांनाच अतिशय जड गेलं. पण वास्तव स्वीकारणं भाग होतं. 'आता पुढं काय?' ह्या प्रश्नाचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आणि मग पुढचा प्रवास सुरू झाला.

मला वाटतं, माझ्या पिढीतल्या इतर स्त्री–पुरुष पालकांप्रमाणं मी, माझ्या कुटुंबातलं पालकत्व – जसं आहे तसं – स्वीकारलं असावं. त्याबद्दल स्वतंत्र विचार केला नव्हता. पण दयाच्या आजारपणानं मी अधिक हळवा, अंतर्मुख झालो असं वाटतं. तिची काळजी, तिचं स्वास्थ्य, तिचं भविष्य ह्या विचारानं माझ्या मनाचा एक कोपरा कायमचा व्यापला, तो आजतागायत ! माझी थोरली मुलगी रोहिणी थट्टेनं म्हणतेदेखील, 'फक्त दयाच एकटी तुमची मुलगी... आम्ही कुणी नाहीच का?...'

## जन्म 'साधना व्हिलेज'चा

दयाच्या आजाराचा, समस्येचा लंबक एका बिंदूवर स्थिरावला. आता तिच्या पुनर्वसनाचा विचार करणं भाग होतं. एकीकडं 'येरळा प्रॉजेक्टस् सोसायटी'ला खानापूर तालुक्यातल्या १९७२ पासूनच्या कामाला सुरुवात होऊन दोन दशकांहून अधिक काळ झाला होता. तिथल्या कामाचं बलस्थान आणि मर्यादा दोन्हीही जाणवत होत्या. दुसरीकडे दयाचा प्रश्न घेऊन मुख्य प्रवाहातल्या मतिमंदांसाठी पुनर्वसनाचं काम करणाऱ्या संस्थांना भेटत होतो. 'माझ्या मुलीसाठी काय असायला हवं !' अशा भूमिकेतून एक पालक म्हणून बघताना, तिथं काय नाही आणि काय असायला हवं, याचं भान येत गेलं. पण एका बाजूला या सगळ्याबाबत काहीसं असमाधान होतं. अशाच एका प्रयत्नात 'रिडर्स डायजेस्ट' या मासिकामार्फत 'कँपहिल् व्हिलेज' ह्या आंतरराष्ट्रीय चळवळीशी संपर्क आला. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान, अनेकांवर आश्रित म्हणून जगण्याची पाळी आली. तेव्हा त्यांनीच पुढाकार घेऊन उभी केलेली 'कँपहिल् व्हिलेज' ही चळवळीच्या स्वरूपातील संस्था आहे. रुडॉल्फ स्टाईनर हे या आंतरराष्ट्रीय चळवळीच्या मागचे वैचारिक तत्त्वज्ञ – आधारस्तंभ ! ॲबरडिन् ह्या स्कॉटलंड येथे सुरू झालेल्या चळवळीत डॉ. कार्ल कुनीग् ह्या प्रवर्तकांनी १९३९ साली पुढाकार घेतला आणि आता वीसहून अधिक देशांमध्ये ११० हून अधिक 'अशा' वसाहती उभ्या राहिल्या आहेत.

'मतिमंदांचं मतिमंदत्व, अपंगत्व मध्यवर्ती न ठेवता एक 'व्यक्ती' म्हणून त्यांना मध्यवर्ती ठेवणं, त्यांना सन्मानानं वागवून, आवश्यक तो अवकाश, निवडीचं स्वातंत्र्य दिलं तर ते अर्थपूर्ण, आनंददायी जीवन जगू शकतात आणि तेही आपापल्या परीनं योगदान देऊ शकतात. आपलं आणि आपल्या भोवतालच्या सर्वसामान्य लोकांचं जीवन समृद्ध करू शकतात.' हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा सारांश उचलला आणि काही सहकाऱ्यांच्या मदतीनं 'साधना व्हिलेज, पुणे' ह्या संस्थेची निर्मिती झाली. 'कँपहिल् व्हिलेज'च्या काही मूलभूत मूल्यांना भारतीय जीवनपद्धत, तत्त्वज्ञान, कला, संस्कृतीची डूब

हेतूपुरस्पर दिली आणि पुण्याजवळ मुळशीच्या कोळवण खोऱ्यात, 'साधना व्हिलेज वसाहत' उभारली गेली.

'येरळा प्रॉजेक्टस् सोसायटी'ची जबाबदारी माझा मुलगा राजा (उर्फ नारायण) यानं घेतली आणि 'साधना व्हिलेज'च्या कामात मी आणि माझ्या सहकारी मेधाताई टेंगशे, विजयाताई कुलकर्णी व इतर सक्रिय झालो.

## गरज अधिक संवेदनशीलतेची

प्रौढ मतिमंदांचा प्रश्न नेमका कोणता आहे? त्यांचं जीवन कसं असावं? ह्याबाबत अनेकदा ऊहापोह केला जातो. मला वाटतं, समाजातला हा गट, ज्याला 'आवाज' नाही, जो सर्वार्थानं कुठल्याही अत्याचाराला बळी (vulnerable) पडणं शक्य आहे, त्याच्या हिताबाबत, शारीरिक, मानसिक स्वास्थ्याबाबत फार संवेदनशील, सजग असायला हवं. हे दयाच्या अनुभवांतून जाणवत होतंच; त्यातूनच एक सूत्र आम्ही सर्वांनी ठरवलं की, ह्या कामाचा ढाचा 'संस्थात्मक स्वरूपा'चा ठेवायचा नाही तो 'गृहात्मक स्वरूपा'चा ठेवायचा. हे मुलांसाठीचं वसतिगृह नसेल तर घर असेल. प्रत्येकाला स्वतंत्र 'अवकाश', निवडीचं स्वातंत्र्य असेल आणि त्यापूर्वी त्याची / तिची अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षितता (शारीरिक, भावनिक / मानसिक) ह्या मूलभूत गरजा सर्वार्थानं भागवल्या जातील. त्यात दर्जाचा आग्रह (अंमलबजावणीतही) धरायचा. या मुलांच्या भावनिक गरजा मोठ्या असतात, हे लक्षात घेणं गरजेचं आहे. 'आपलं कोणीतरी आहे' असं त्यांना वाटणं महत्त्वाचं असतं. वैयक्तिक भावबंधातूनच असं नातं निर्माण होऊ शकतं. साधनामध्ये आमचा तोच प्रयत्न असतो. प्रत्येक मुलाच्या भावनिक गरजा वेगळ्या असतात, प्रत्येक मुलाचं वैशिष्ट्य वेगळं असतं, हे लक्षात घेऊन वागायला लागतं. अमूक काम महत्त्वाचं, अमूक बिनमहत्त्वाचं असे आपले निकषही यांच्यासाठी लावणं योग्य नाही. उदा. योगेश नाष्टा नेऊन देण्याचं काम मनापासून, जबाबदारीनं करतो हे ओळखून त्याला ते आठवणीनं करायला देणं किंवा रात्री गेट लावायचं, दारांना कुलूप लावलंय का हे पहायचं काम गिरीश जबाबदारीनं करतो. कुणाला नेमकं काय आवडतं हे अचूक ओळखणं आवश्यक असतं. ही छोटी छोटी कामं त्यांना आत्मभान देतात, त्यांचा आत्मसन्मान वाढवतात. प्रौढ मतिमंदांचा उल्लेख आम्ही 'साधना व्हिलेज'मध्ये 'विशेष मित्र' किंवा 'साधक' असा करतो. त्यांचं 'पहिल्या घरा'तलं (म्हणजे, जिथे ते जन्मले / लहानाचे मोठे झाले) स्थान पक्कं ठेवायचं आणि ती सारी वैशिष्ट्यं ह्या 'दुसऱ्या घरा'त (म्हणजे केंद्राच्या घरांमध्ये) अबाधित राखायची; असा आग्रही दृष्टिकोन आम्ही अगदी



पहिल्यापासून ठेवलेला आहे. इथे समवयस्कांमध्ये राहणाऱ्याचा आनंद मुलांना मिळतो. छान मैत्र तयार होतं. आपापल्या परीनं एकमेकांना मदत करावीशी वाटते. दुसरं एक म्हणजे विशेष मित्रांच्या योगदानाचं मोल 'आर्थिक मोबदल्यात' परिवर्तित करायचं नाही, तर रोजच्या दैनंदिन कामांत त्यांचा सहभाग घ्यायचा. एखाद्याला तेही करायची इच्छा नसल्यास, 'नाही' म्हणायचा हक्क आहे आणि तो त्याच्याशी संबंधित कार्यकर्त्यांनी मान्य करायला हवा असं मला वाटतं. काही वेळेस मी विशेष मित्रांचे अधिक लाड करतो, शिस्तपालनाबाबत आग्रही राहत नाही, असा माझ्याबद्दल आक्षेपही घेतला जातो. तेव्हा - मेधाताई गमतीनं, विजयाताईंना म्हणतात, ''आपणही विशेष मित्र असतो तर बरं झालं असतं.'' मला नेहेमी वाटतं की, विशेष मित्रांना आपलं आयुष्य आपल्या आवडीप्रमाणं जगण्याची संधी मिळाली आहे, पण आपण सर्वसामान्य लोकांच्या अपेक्षांच्या आणि नियमांच्या चौकटीत त्यांना बसवतो.

## ग्रामविकासाच्या वाटेनं जाणारं पालकत्व

ज्या निसर्गरम्यतेचा, 'साधना'च्या 'विशेष मित्रांना' 'उपचारात्मक' स्वरूपाचा उपयोग होतो आहे, त्याच डोंगराळ भागामुळं कोळवण खोऱ्याचा ग्रामीण भाग मागासलेला राहिला. दळणवळणाच्या साधनांचा अभाव, राजकीय नेतृत्वाचं दुर्लक्ष, मुंबई-पुणे ह्या दोन्ही महानगरांच्या जवळ असल्यामुळं स्थानिक जनतेचं सातत्यानं होणारं स्थलांतर हे इथले प्रश्न लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यातूनच ग्रामीण महिलांचं संघटन / सबलीकरण, शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी प्रयोग सुरू झाले. खोऱ्यातल्या तरुणांना जोडून घेण्यात यश येईना, म्हणून मग लहान मुलांसोबत काम केलं तर अधिक परिणामकारक होईल अशा विचारानं, लहान मुलांसाठी 'गंमतघर', 'पूरक शिक्षण वर्ग', 'दत्तक पालक योजना', 'उपक्रम केंद्र' आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर देणारं 'साधना इंग्लिश स्कूल' सुरू करण्यात आलं. मुलांसाठीच्या या सर्व कामांमध्ये माझ्या धाकट्या मुलीचा, रंजनाचा पुढाकार होता, अद्यापही आहे. मला वाटतं हा एकात्मिक दृष्टिकोन हे साधना व्हिलेजचं वैशिष्ट्य आहे. या कामामुळं मतिमंदत्वाचा स्वीकार व्हायला, त्याविषयीची समाजातली जागरूकता आणि

संवेदनशीलता वाढायला मदत झालेली आहे. साधनाचं पहिलं घर सुरू झालं तेव्हा 'वेड्यांना आमच्या इथे कशाला आणलं' असं म्हणून ग्रामस्थांनी विरोध केलेला होता. आता त्यांचा एक सहज स्वीकार झालेला दिसतो. मुलं गावात लग्नाला, उरसाला जातात. इथंही सतत बायका, मुलं येत जात असतात. दुसरं म्हणजे मतिमंदांबरोबर २४ तास सतत राहणं हे कोणाही व्यक्तीला अवघड आहे. फक्त तेवढंच काम असेल तर कार्यकर्त्यांमध्ये मरगळ येते, फार काळ ते या कामात टिकत नाहीत. पण मेधाताई, विजयाताई, मंगलआत्या ज्या ऊर्जेनं, उत्साहानं इतकी वर्षं हे काम करताहेत ते पाहिलं की वाटतं की याचं रहस्य साधनानं स्वीकारलेल्या या एकात्मिक दृष्टिकोनात आहे.



## गोळाबेरजेतून दिसणारं चित्र

'साधना व्हिलेज'च्या स्थापनेला नुकतीच वीस वर्षं पूर्ण झाली. ह्या कालावधीतील कामाची गोळाबेरीज केली तर काय चित्र दिसतं? 'साधना व्हिलेज'च्या पुनर्वसन केंद्रानं, ज्या मतिमंद व्यक्तींचं पुनर्वसन केलं त्यांची संख्या छोटीशी आहे. पण त्यानिमित्तानं केलेला प्रयोग इतर ठिकाणी, इतर संस्थांच्या, मतिमंद व्यक्तींच्या पालकांच्या पुढाकारानं पुन्हा केला जाऊ शकतो.

आपल्या स्वतःच्या मतिमंद आणि मनोरुग्ण पाल्याच्या भविष्याच्या चिंतेपुरतं मर्यादित न राहता, अशा प्रकारच्या अनेक व्यक्तींचं पालकत्व आपल्याला घेता आलं, एव्हढंच नव्हे तर कोळवण येथील ग्रामीण मतिमंद निगराणी केंद्राच्या (डे केअर) उपक्रमामार्फत तो प्रश्न समाजापुढे मांडता आला, भोवतालच्या समाजाशी मतिमंदांना जोडून, त्यांच्यात संवाद, एकात्मता साधता आली, याचं समाधान निश्चित आहे. नाहीतर, एरवी चार भिंतीआड आणि बंद दरवाज्यातच ज्यांचं स्थान अधोरेखित केलं आहे अशा मतिमंद व्यक्ती, समाजात कशा मिसळल्या असत्या?

ग्रामीण महिलांच्याबाबत 'आत्मभान ते गावाचं नेतृत्व' असा विकास अपेक्षित आहे. मंदगतीनं पण सातत्यानं चालणारा, त्यांचा हा प्रवास आज ना उद्या निर्णायक होईल, असं वाटतं. 'दत्तक पालक योजने'तून आणि मुलांच्या इतर उपक्रमांमधून कोळवण खोऱ्यातून बाहेर पडणारी उद्याची तरुण पिढी काही सामर्थ्य घेऊन बाहेर पडेल आणि चांगल्या दर्जाचं जीवन जगेल अशी आशा वाटते.

## सूत्रे पुढच्या पिढीच्या हातात

आपल्या हयातीत संस्था हस्तांतरित व्हावी आणि आपल्यानंतरही संस्था टिकून रहावी हा विचार मनाशी पक्का होताच. 'येरळा प्रॉजेक्टस् सोसायटी'ची जबाबदारी राजानं घेतली, त्यानं ते काम वेगळ्या पद्धतीनं वाढवलं – त्यानं आता जतसारख्या दुर्लक्षित, सीमेवरच्या तालुक्यामध्ये जालिहाळ भागात काम सुरू केलंय. तिथली आव्हानं अजून निराळी आहेत. शिक्षण हा त्याच्या कामाचा केंद्रबिंदू आहे. ऊसतोडणी कामगारांची मुलं स्थलांतरामुळे नीट शिक्षण घेऊ शकत नाहीत. म्हणून त्यांनाच रोजगाराची पक्की साधनं उपलब्ध करून दिली आहेत. वेश्या व्यवसाय करणाऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू केलंय. 'येरळावाणी' हा कम्युनिटी रेडिओचा वेगळा प्रयोग तो चांगल्या प्रकारे राबवतो आहे. 'येरळावाणी'चं वैशिष्ट्य म्हणजे तो पवनचक्कीवर चालणारा भारतातला एकमेव कम्युनिटी रेडिओ असावा. त्याची सर्व जबाबदारी एक अंधमित्र संभाळतो आहे. असे प्रशिक्षित अंधमित्र तयार करून इतर आकाशवाणी केंद्रांमध्ये रुजू करावेत असाही राजाचा प्रयत्न आहे.

'साधना व्हिलेज'साठी रंजनानं तयारी दाखवली. हस्तांतरण करताना एक विचार स्पष्ट होता की, एकदा जबाबदारी दिल्यानंतर ढवळाढवळ करायची नाही. सर्वांना स्वातंत्र्य हवंच. त्यांचे निर्णय त्यांना घेऊ दयायचे, विश्वास ठेवायचा. चुका करून सुधारायची ज्याची त्याची 'स्पेस' (अवकाश) मान्य करायची. 'येरळा', 'साधना' या दोन्ही संस्थांमध्ये 'टीम' म्हणून काम केलं जातं. प्रत्येक व्यक्तीचा निर्णय, कार्यक्षेत्र ह्याबाबत अवकाश आणि स्वातंत्र्य मान्य केलं जातं; लोकशाहीतलं हे मूल्य ह्या सांघिक कामात दिसतं आणि समाधान वाटतं.

तरीही, महाविद्यालयाच्या 'कॉमन रूम' मध्ये बसून नेहरू आणि गांधी घराण्याच्या घराणेशाहीवर एकेकाळी आपण हिरिरीनं टीका करत होतो, त्याच वाटेनं आपण गेलो का, की आपली वाट पुढे चालू ठेवण्याची, त्यावर चालत राहण्याची जबाबदारी आपल्या मुलांना वाटली, ह्याचं समाधान मानावं?... ह्या संभ्रमात मी आहे.

## समाधानाचे काही टप्पे

कुठल्याही कामात येतात, तसे ह्या कामातही वैफल्याचे क्षण आले. त्यांचा त्या वेळी त्रास झाला हे खरं पण त्यामुळं प्रगल्भता वाढायला निश्चितच मदत झाली.

दोन्ही संस्थांच्या कामामध्ये अनेक व्यक्तींचं योगदान लाभलं. त्यामध्ये 'येरळा प्रॉजेक्टस् सोसायटी'शी निगडित अरविंद राजहंस, पशु-तज्ज्ञ डॉ. जोशी, वसंत आपटे, माधुरी जोगळेकर, वेळापूरकर, जी. ए. जोशी, संपतराव पवार यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. तर 'साधना व्हिलेज'च्या संदर्भात श्रीमती मंगल (आत्या) पाटील, शंकर (भाऊ) गोळे यांचा ! 'साधना'चे एक स्वयंसेवक हसमुखभाई वसवा यांनी तर 'साधना'च्या धर्तीवर 'होप व्हिलेज' नावाचं काम गुजराथेत उभारून, 'साधना'चा वारसा पुढे चालवलाय. या कामात मोलाचा वाटा उचलणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हिताचा, भविष्याचा विचार करून तशी तरतूदही दोन्ही संस्थांनी आवर्जून केलेली आहे.

माझी पत्नी मंजुळा आणि माझं व्यक्तिमत्त्व भिन्न आहे पण आम्ही परस्परांना आपापली स्पेस् दिली. ज्या दयासाठी 'साधना व्हिलेज' उभारलं, तिथे ती तिच्या तब्येतीच्या आणि इतर कौटुंबिक कारणांनी राहू शकली नाही, ह्याची खंत मनाशी जरूर आहे पण तिच्या भावंडांनी, तिचं 'पहिलं घर' भक्कम ठेवलंय, म्हणून तिचं भविष्य सुरक्षित, आश्वासक वाटतं.

आयुष्याच्या या टप्प्यावर एक समाधान जरूर वाटतं, आपल्याला जे योग्य वाटलं त्यातलं जेवढं करणं शक्य होतं, ते निकरानं केलं. आपण आपल्यापरीनं घेतलेल्या जबाबदाऱ्या, संस्थांचं काम - पुढच्या पिढीच्या हातात देता आलं.

एका अर्थानं, 'संस्थांचं पालकत्व' दुसऱ्यांच्या हातात सुरक्षित आहे, हे समाधान मनासोबत आहे. कुठल्याही 'पालका'ला याहून आणखी दुसरं काय हवं?

शब्दांकन : **मेधा टेंगशे, माधुरी सुमंत**
विशेष साहाय्य : विजया कुलकर्णी, रंजना बाजी
sadhanavill@gmail.com



# मुलांना रस वाटेल असं थोडंसंच काहीतरी...

आज चौथीच्या वर्गात आम्ही Natural Things Around Us' वर काम करणार होतो. २-३ इंग्लिश गाणी म्हणून मुलं स्थिरस्थावर झाल्यावर त्यांच्याशी गप्पा मारायला सुरुवात केली. Natural म्हणजे काय, things कशाला म्हणायचं, Around आणि round मधला फरक काय अशी चर्चा झाली. मग 1, 2, 3, 4, 1, 2, 3, 4 असं म्हणायला लावून त्यांचे चार गट केले. आणि मग एकेक गट घेऊन आम्ही निघालो भटकायला ! तोपर्यंत बाकीच्या गटांनी वर्गात बसून वेगळं काम करायचं होतं. आपल्या सभोवतालच्या जितक्या म्हणून नैसर्गिक गोष्टींची नावं आठवतायत त्यांची त्यांनी इंग्लिशमध्ये यादी करायची होती.

वातावरण मस्तच होतं. झिरझिर पाऊस आणि गार हवा. मुलं बागडत बागडत निघाली. फार लांब जायचं नव्हतंच. शाळेच्या भोवतीनं एक फेरफटका मारायचा होता फक्त. आणि करायचं एकच होतं, आसपास दिसणाऱ्या सगळ्या नैसर्गिक गोष्टींची इंग्लिशमध्ये नावं सांगणं. Tree, leaves, flowers, birds, butterfly असे नेहमीचे शब्द सगळ्याच गटांकडून आले. काहीजणांनी जरा वेगळे शब्दही सुचवले: branches, raindrops, वगैरे. याला काय म्हणायचं, त्याला काय म्हणायचं असे प्रश्नसुद्धा येत होते. त्यातूनच मग वेलाला climber, सालीला bark, डबक्याला puddle, चिखलाला mud अशा नव्या शब्दांची ओळख झाली. परवा शाळेत पायरीवरून घसरून पडले तेव्हा चौथीचाच एकजण ओरडला,



‘‘ताई, तुम्हाला mud लागलंय !’’ म्हटलं, चला ! याला तरी हा नवा शब्द नीट समजलाय!

जमिनीच्या भेगांना cracks म्हणतात हे समजल्यावर एकीला crack cream ची जाहिरात आठवली. अशी जोडणी केल्यामुळे नवे शब्द लक्षात रहायला खूपच मदत होते. याशिवाय connections long leaves, pointed leaves, smooth leaves, rough leaves अशा वैशिष्ट्य सांगणाऱ्या थोड्या शब्दांचीपण चर्चा झाली. आता पुढचं काम असं होतं की हे सगळे जुने-नवे शब्द आठवून गटामध्ये बसूनच वहीत लिहून काढायचे. हे सगळं होईतो तास संपला.

पुढच्या तासाला सगळ्या गटांच्या सगळ्या शब्दांचं फळ्यावर एकत्रीकरण केलं. फिरायला जायच्या आधी केलेल्या याद्यांमध्ये त्यावेळी न दिसणाऱ्या गोष्टी, म्हणजे moon, stars, lake, river असे शब्दही आता आले होते. जवळजवळ साठेक शब्दांची फळ्यावर गर्दी झाली. मुलांच्या चार गटांना सांगितलं की आता यातले १० -१२ शब्द, साधारण एका प्रकारात मोडतील असे, निवडा. सगळ्यांचं निवडून झालं तेव्हा आपसूकच पावसाळा, उन्हाळा, रात्र आणि झाडाचे वेगवेगळे भाग असे चार विषय त्यातून तयार झालेत असं लक्षात आलं. आता पुढच्या तासाला हे सगळे शब्द येतील असं एक चित्र गटामध्ये तयार करायचंय असं सांगितल्यावर मुलं फारच खूश झाली. आणि जे पाहिजे ते साहित्य वापरा असं म्हटल्यावर तर उत्साह आणि सर्जनशीलतेला उधाणच आलं.

पुढच्या तीन तासिका मुलं त्यांच्या चित्रांवर काम करत होती. (चित्रकलेच्या सुशांतसरांनी उदारपणे त्यांचेही काही तास दिल्यामुळे फारच मदत झाली.) काय काय वापरलं त्यांनी ! पानं, फुलं, काटक्या, पेपरमधली रंगीत चित्रं... गुलमोहराच्या कळ्यांची आवरणं चिकटवून त्याच्या शेंगा बनवल्या, काटक्यांची सालं काढून त्यापासून घरटं बनवलं, पुठ्ठ्याचा किडा बनवून त्याचे पाय दुमडून तो झाडावर चिकटवला आणि अजून बरंच काही.

एकमेकांपासून एकदम वेगळी आणि सुरेख अशी चार चित्रं तयार झाली. ती आम्ही वर्गामध्ये लावली. इंग्लिशच्या पुढच्या तासाला मी सर्व शब्दांच्या चिठ्ठ्या बनवून घेऊन गेले. सगळी चित्रं समोर ठेवली. एकेकजण उठून यायचा, एक शब्द उचलायचा, तो वाचून, अर्थ समजावून घेऊन चित्रामध्ये शोधून तिथे ती चिठ्ठी चिकटवायचा. अशा सगळ्या चिठ्ठ्या लावून झाल्या. ही सगळी चित्रं वर्गात पुढचे दोन आठवडे होती. अधून मधून आम्ही उजळणी करायचो. शब्दांशी संबंधित काही खेळ घ्यायचो. त्यातले कुठले शब्द एखाद्या पुस्तकवाचनाच्या वेळी आले तर एकमेकांना आठवण करून द्यायचो.

नुकतीच या सगळ्या शब्दांवर आधारित चाचणी घेतली. मराठी शब्द पाहून त्यांचे इंग्लिश शब्द लिहिणं, शब्दाचा अर्थ समजावून घेऊन त्याचं चित्र काढणं, ऐकून शब्द लिहिणं अशा वेगवेगळ्या गोष्टी चाचणीमध्ये होत्या. जवळजवळ सर्वच मुलांनी बरोबर उत्तरं लिहिली. स्पेलिंगच्या बऱ्याच चुका असल्या तरी त्या शब्दांचे उच्चार आणि अर्थ मुलांना माहीत आहेत हे कळत होतं.

मुलांना रस वाटेल असं थोडंसंच काहीतरी वर्गात द्यायची फक्त गरज असते. मग त्यांचा उत्साह आणि शिकणं पहातच रहावं.

**मधुरा मणेर,** कमला निंबकर बालभवन, फलटण

rmadhuraa@gmail.com



# जनसंवाद शिक्षणहक्काचा

शिक्षण हक्क कायदा लागू होऊन ४ वर्षं झाली. कायद्यात एक महत्त्वाची तरतूद आहे, ती म्हणजे वंचित घटकांमधल्या मुलांसाठी खाजगी शाळांमध्ये प्रवेशबिंदूपासूनच २५ टक्के आरक्षणाची. (वंचित म्हणजे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील मुलं, आणि अपंग मुलं.) या आरक्षणाबाबतची जमिनीवरची परिस्थिती काय आहे, पालकांचे अनुभव काय आहेत, त्यांना कोणत्या अडचणी येतात, शाळा – मुख्याध्यापकांचे अनुभव आणि यासंदर्भातले विचार काय आहेत याविषयीची चर्चा करण्यासाठी एक बैठक – ‘जनसंवाद’ ७ ऑगस्ट रोजी पुण्यामध्ये आयोजित करण्यात आली होती. कागद–काच–पत्रा कष्टकरी पंचायत, एस.एम.जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन, बाल हक्क कृती समिती – आर्क, अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा, भारत ज्ञान विज्ञान समुदाय आणि आरक्षण हक्क संरक्षण समिती अशा विविध संस्थांनी मिळून या जनसंवादाचं आयोजन केलेलं होतं. यामध्ये कचरा–वेचक पालक, विविध शाळांचे प्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी उपस्थित होते. पालकांपैकी अनेकांनी २५ टक्के आरक्षणाच्या तरतुदीसंदर्भातला अनुभव घेतलेला होता किंवा नजीकच्या काळात त्यांना या तरतुदीचा उपयोग करून घ्यायचा होता.

कार्यक्रमाची सुरुवात जोरदार घोषणांनी आणि चळवळीच्या गाण्यांनी झाली. अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेचे शरद जावडेकर यांनी सुरुवातीलाच ‘पालक, समाजसेवी संस्था व सरकारी अधिकारी यांच्यात संवाद व्हावा’, यासाठी जनसंवादाचं आयोजन केलं असल्याचं स्पष्ट केलं. ते म्हणाले, ‘‘२५ टक्के आरक्षणानं फार मोठी क्रांती घडणार आहे, असं आमचं मत नाही. पण एक मात्र नक्की की, त्यामुळे गरीब मुलांची शिक्षणापर्यंतची पोहोच वाढणार आहे. कायद्यातील या तरतुदींचं हे महत्त्व कोणीच नाकारत नाही. पण तरीसुद्धा ज्याप्रमाणे मलेरियाची साथ आहे म्हणून लोकांना केवळ ओडोमास किंवा गुडनाइटसारखं डास पळवणारं औषध देऊन उपयोग होत नाही, डास का होताहेत, याच्या मुळापर्यंत शिरून त्या कारणांचा नाश करण्याची खरी गरज असते; त्याचप्रमाणे खऱ्या अर्थानं सामाजिक बदल घडवायचा असेल तर समाजातील विषमतेच्या मुळापर्यंत जायला हवं, शिक्षणाच्या व्यापारीकरणाला प्रश्न विचारायला हवेत. २५ टक्के आरक्षणासारख्या उपाययोजना फायद्याच्या आहेत पण ती अल्पकाळासाठीची उपाय योजना आहे. तरीही सुरुवातीला आपल्याला ‘ओडोमासचं वाटप करायचंच असेल’ तर त्याचं न्याय्य वाटप होतं आहे आणि खऱ्या गरजूंपर्यंत ते पोचतं आहे हे तरी आपण बघायला हवं. म्हणूनच शिक्षणहक्क कायद्यामध्ये अनेक उणिवा आहेत हे आपल्या सर्वांना माहिती असलं, तरी या तरतुदीचा फायदा जास्तीत जास्त गरीब मुलांना कसा मिळेल हे आपण पहायलाच हवं. गेले सहा महिने कागद–काच–पत्रा कष्टकरी पंचायत आणि इतर कार्यकर्ते गरीब पालकांमध्ये २५ टक्के आरक्षणाच्या तरतुदीविषयी जाणीवजागृती करण्याचं काम करत आहेत, या संदर्भात येणाऱ्या अडचणींबाबत सरकारी अधिकाऱ्यांशी बोलत आहेत. तरीदेखील पुणे शहरातल्या आरक्षणापैकी ८४ टक्के जागा आजही रिकाम्याच आहेत. याचाच अर्थ याबाबत लोकांमध्ये फार मोठ्या प्रमाणात जागृती करण्याची गरज आहे. याबाबत सरकारही पुरेसे प्रयत्न करताना दिसत नाही. या संदर्भात टीव्हीवर किंवा वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीपण दिसत नाहीत.’’

मागास, गरीब घटकातील पालकांविषयी बोलताना ते पुढे म्हणाले, ‘‘या कायद्याविषयी केवळ माहितीचा अभाव हीच एक पालकांची अडचण नसून सर्व सरकारी कागदपत्रांची पूर्तता करणं हे मोठं आव्हान त्यांच्यासमोर आहे. जातीचा दाखला, आर्थिक उत्पन्नाचा दाखला, इत्यादी मिळवण्यासाठी वेगवेगळ्या सरकारी कार्यालयात फेऱ्या मारणं, बराच वेळ रांगांमध्ये उभं राहणं हे या कष्टकरी गटाला परवडणारं नाही. रोजगार बुडवणं त्यांना परवडणारं नाही. त्याऐवजी सरकारनं ‘केंद्रीय प्रवेश विभाग’ सुरू करावा. त्यामुळे एकाच ठिकाणी पालकांना माहिती मिळेल, दाखले तपासून मिळतील, आणि त्यांना इकडून तिकडे सारखे खेटे घालावे लागणार नाहीत. सरकारनं आरक्षणाची तरतूद केलेली आहे पण त्याच्या अंमलबजावणीबाबतही ते गंभीर आहे हे त्यांना सिद्ध करावं लागेल.’’

सरांच्या भाषणानंतर अनुरता त्रिभुवन यांनी बालहक्क कृती समितीसाठी बनवलेला लघुपट दाखवण्यात आला. यामध्ये २५ टक्के आरक्षणाबाबत पालकांना आलेल्या अडचणी व खाजगी शाळांकडून त्यांना मिळणारी अवमानकारक वागणूक याचं चित्रण होतं.

यानंतर पालकांनी यासंदर्भातले आपले अनुभव मांडले. शुभांगी चव्हाण (तळजाई वस्ती) म्हणाल्या, ‘‘माझ्या मुलाला अरण्येश्वरच्या (खाजगी) शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी मी सात फेऱ्या मारल्या. त्यांनी



जन्माचा दाखला मागितला, मी तो बनवून घेतला. त्यांनी जी सारी कागदपत्रं मागितली, ती मी सगळी दिली. तरी ते दरवेळी नवाच प्रश्न काढत. पण मी मागं हटले नाही. मला कितीही अडचणी आल्या, कितीही त्रास झाला तरी माझा निर्धार पक्का होता. माझ्या वस्तीतल्या लोकांनी, आमच्या मुलांचा शिक्षणाचा हक्क मिळविण्यासाठी कशाला घाबरायचं? त्यांना सरकारनं शिक्षणाचा – इंग्रजी शिक्षणाचा हक्क दिलाय. आणि त्यामुळे आमची प्रगती होणार आहे. शाळेत मला पैसे भरायला सांगितले, पण मी त्यांना सांगितलं की हे सगळं 'मोफत' आहे. मी मागं हटणार नाही. मी लहान असताना हुशार होते. तिसरीला वर्गात माझा पहिला नंबर होता, पण गरिबीमुळं मला पुढं शिकता आलं नाही. माझं शिक्षण अर्धवट राहिलं. माझ्या मुलाच्या बाबतीत मी तसं होऊ देणार नाही. मी सर्व प्रयत्न केलेत, अजून पण माझ्या मुलाला त्या शाळेत घेतलेलं नाही. पण मी प्रयत्न सोडलेले नाहीत. मी ॲडमिशन मिळवूनच दाखवेन.''

कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायतच्या कार्यकर्त्या अर्चना यांनी त्यांच्या मुलाच्या प्रवेशाची हकिकत सांगितली, ''आठ पालकांनी मिळून एस.एन.बी.पी. शाळेत प्रवेशासाठी जानेवारी महिन्यात अर्ज दिले. दर आठ दिवसांनी फोन करून मी चौकशी करत होते. त्यांनी प्रवेश निश्चित असल्याची खात्री दिली. मात्र जूनमध्ये त्यांनी सांगितलं की मोफत प्रवेश पहिलीपासून असून बालवाडीकरिता फी भरावी लागेल.

पुणे इंटरनॅशनल शाळेत तर त्यांनी आम्हाला प्रवेशअर्ज द्यायचंही नाकारलं. कार्यकर्ता सोबत आल्यावर त्यांनी आम्हाला प्रवेशअर्ज दिला. २२ जूनपर्यंत त्यांनी प्रवेशाबद्दल सांगितलं नाही. पुन्हा एकदा कार्यकर्ता आल्यावर मात्र त्यांनी दोन मुलांना प्रवेश दिले. फक्त दोन मुलांनाच.''

लीलाबाई देहाडे यांनी आपल्या नातीच्या प्रवेशाचा किस्सा सांगितला. ''सर्व कागदपत्रांची पूर्तता करून खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला. जूनपासून माझी नात शाळेत जात आहे. तिला आता Head, lips, hand, legs असे इंग्रजी शब्द समजतात. तिनं मलाही ते शिकवलंय'' आणि त्यानंतर त्या आजींनी Johny Johny... yes papa ही कविताही म्हटली.

इंग्रजी शिकण्यानं आपल्या मुलांचं भवितव्य उज्ज्वल होईल, आयुष्यात त्यांना चांगल्या संधी मिळतील आणि कचरा वेचकाचं जिणं त्यांच्या



वाट्याला येणार नाही – अशी भावना अनेक पालकांनी बोलून दाखवली.

निर्मल कोकणे म्हणाल्या, ''माझ्या नातवाला ॲडमिशन मिळाली. तो शाळेतही जात होता. एक दिवस अचानक शाळेनं ११,००० रु. फीचे भरायला सांगितले. मी त्यांना सांगितलं की मोफत शिक्षण त्याचा हक्क आहे. मग त्यांनी १५०० रु.पर्यंत फी कमी केली. ते म्हणाले की, एवढी तरी फी तुम्ही भरायलाच हवी आणि असं पण लिहून द्यायला हवं की शाळेनं माझ्याकडून कसलीही फी घेतलेली नाही. पण मी पैसेही भरले नाहीत आणि काही लिहूनही दिलं नाही. माझा नातू तिथंच आहे आणि तिथंच शिकेल.''

शारदा वार्णींनी एम.आय.टी.नं आपल्याकडं युनिफॉर्मचे, स्वेटरचे १२०० रु. मागितल्याचं सांगितलं.

आर्कच्या प्रतिनिधी क्रांती यांनी 'मोफत शिक्षणाचा' अर्थ स्पष्ट केला. मोफत शिक्षण म्हणजे मोफत युनिफॉर्म, मोफत वह्या-पुस्तकं, मोफत प्रवेशअर्ज, शाळेतील सर्व सुविधा मोफत असणं. यासाठी सर्व पैसे सरकार शाळांना देतं.

डॉ. संतोष सुपे यांनी कोणत्याही संस्थेची मदत न घेता केलेल्या प्रवेशाविषयीच्या प्रयत्नांचा अनुभव मांडला. ते म्हणाले, ''आम्ही १० पालक गुरुकुल शाळेत प्रवेशासाठी गेलो. या शाळेच्या चांगला निकालाबद्दल आणि प्रगतीबद्दल ऐकल्यामुळे आम्हाला आमच्या मुलांना या शाळेत घालायचं होतं. शाळेनं आम्हाला शाळेचा गणवेश इत्यादीसाठी जास्तीचे पैसे खर्च करायला सांगितले. मात्र आमच्या हे लक्षात आलं की २५ टक्के आरक्षणाद्वारे प्रवेश घेतलेल्या मुलांना शाळा १२.३० पर्यंत शिकवते व इतर मुलांना ४.३० वाजेपर्यंत. आम्ही चौकशी केली असता त्यांनी सांगितलं की शिक्षणहक्क कायदा केवळ शिक्षणासाठी आहे इतर उपक्रमांना लागू नाही; २५ टक्के आरक्षणाच्या विद्यार्थ्यांना शालेय उपक्रमात सहभागी होता येईल, अभ्यासेतर उपक्रमांमध्ये त्यांना सामील होता येणार नाही. मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून जी शाळा आम्ही निवडली ती शाळा मुलामुलांमध्ये असा भेदभाव कसा करू शकते?''

काही खाजगी शाळांनी मनापासून या तरतुदींची अंमलबजावणी केली. त्यामध्ये पुण्यातील राष्ट्रसेवा दलाची हडपसरची आणि पर्वती पायथ्यांची अशा दोन्ही साने गुरुजी शाळा आहेत. शाळेच्या व्यवस्थापनानं महत्त्वाची सहकार्याची भूमिका घेतल्यानंच हे शक्य झालं व भविष्यातही हे करू असं त्यांनी सांगितलं. ''पूर्वीदेखील कागदपत्रांसाठी आम्ही अडवणूक करत नव्हतो. पण आता कायद्यामुळे ते सक्तीचं झालं आहे. 'मूल शाळेत येईल' यावरच आमचा भर असतो.''

डॉ. साठे यांनी पोतराजांच्या वस्तीतील मुलांच्या शिक्षणाचे प्रश्न मांडले. पोतराज हा सतत भटकणारा, गरीब भटका समूह आहे. त्यामुळे त्यांच्याकडे रहिवासी दाखला, उत्पन्नाचा कागद कुठून येणार? अशा मुलांसाठी त्या वस्तीजवळच्याच शाळेनं सहकार्य केलं, प्रवेश दिले. अशा तीस मुलांचा खर्च 'आरोग्यसेना' या स्वयंसेवी संघटनेनं उचलला आहे.

पालकांच्या अडचणी ह्या मुख्यत्वेकरून शाळेत प्रवेश न देणं, त्यांना गणवेश, पुस्तके इत्यादीसाठी पैसे मागणं, मुलांना शाळांत वेगळी वागणूक देणं अशा स्वरूपाच्या होत्या.

मगरपट्टा पब्लिक स्कूलच्या प्रतिनिधीनं सांगितलं, ''शाळेनं ३५ मुलांना प्रवेश देऊन आरक्षणाच्या जागा कोटा पूर्ण केलेला आहे. शाळा २ युनिफॉर्म मोफत देते. पण शाळेचे उपक्रम लक्षात घेता ते पुरेसे नाहीत. तरी, गरीब पालकांनीही तिसऱ्या युनिफॉर्मचा खर्च जितका होईल तितका आपण होऊन उचलावा.''

जर पालकांची इच्छा असेल तर शिक्षणहक्क कायद्यामधली ३ कि.मी. अंतरावरच्या शाळेची अटही शिथिल करावी अशी सूचना आणखी एक पालक अरविंद जवते यांनी केली. 'केवळ ॲडमिशन मिळाली म्हणून समाधान न मानता पालकांनी शाळेच्या पालक शिक्षक समित्यांच्या सभांना हजर रहावं. युनिफॉर्मसाठी पैसे मागितले याचा बाऊ न करता प्रथम ॲडमिशन पदरात पाडून घ्यावी' असा सल्ला त्यांनी पालकांना दिला.

यानंतर सरकारी प्रतिनिधी या नात्यानं पुणे शिक्षण मंडळाच्या श्री. परदेशी यांनी विचार मांडले. कायद्याची सविस्तर माहिती दिली.

''अंमलबजावणीबाबत हळूहळू पण निश्चितपणे प्रगती होताना दिसते आहे. पुणे शहरात सुमारे ६० टक्के जागा भरलेल्या आहेत. उरलेल्या ४० टक्के जागा भरण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचे आहेत. पुणे शिक्षण मंडळानं यासाठी महत्त्वाच्या कृती केल्या आहेत. शाळांना '२५ टक्के आरक्षणादरम्यान मोफत प्रवेश दिला जाईल' असे फलक लावण्यास सांगितलं. शाळा-तपासणीस जाणाऱ्या अधिकाऱ्यांना याकडे लक्ष देण्यास व त्या फलकांचे फोटो काढण्यास सांगितलं. ज्या शाळा असं करण्यास दिरंगाई करतील त्यांच्यावर कारवाई केली. विद्यार्थ्यांची यादी - www.pmcschoolboard.com या संकेतस्थळावर पाहता येईल. खाजगी शाळात २५ टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थामागे रु. १०,५००/- इतका निधी शाळांना देण्यात येतो.

परदेशींनी पालक व संस्थांना आवाहन केलं, ''तुम्ही चिकाटीनं हा लढा पुढे न्या. सरकारी यंत्रणा हवं तितकं सहकार्य करेल. ज्या शाळा असे प्रवेश नाकारतात त्यांना कडक कारवाईस सामोरं जावं लागेल. शाळांचा उद्देश मुलांना शिकवणं आहे. मग शाळा विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारून घरी कसं पाठवतात?''

भारत ज्ञान विज्ञान समुदायाच्या विनया मालती हरी यांनी कायद्याविषयीच्या इतर तरतुदींवर प्रकाश टाकताना सांगितलं.

''ज्या शाळांना जमीन, इमारत इत्यादी स्वरूपाचं अनुदान यापूर्वी मिळालं असेल त्या शाळांनी २५ टक्के आरक्षणाची पूर्तता करायलाच हवी. तसंच प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती असावी. त्यामध्येही २५ टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या पालकांचा सहभाग असावा.

शिक्षणहक्क म्हणजे केवळ मोफत शिक्षण किंवा २५ टक्के आरक्षण एवढंच मर्यादित नसून, दर्जात्मक शिक्षणाची ग्वाहीही कायदा देतो. पालकांनी केवळ मोफत शिक्षणाचा लाभ न घेता त्याचा दर्जा सुधारेल याकडे विशेष लक्ष द्यावे.''

आरक्षण हक्क संरक्षण समितीचे कार्यकर्ते संजय दाभाडे यांनी वरील सर्व मुद्यांचा अंतर्भाव असलेला मागणीनामा मांडला आणि या जनसंवादाचा समारोप झाला.

**पूजा करंजे,** आर्क, पुणे.
karanje.poooja@gmail.com

शिक्षणवेध दिवाळी २०१३



सर्व (?) समावेशित (?) शिक्षण (?)

शिक्षणात अडथळा आणतात, अशा शारीरिक, मानसिक अपंगत्वावर मात करत शिक्षणव्यवस्थेत हक्काची लढाई लढणाऱ्या आणि शिक्षणात संपूर्ण सहभागाची अपेक्षा बाळगणाऱ्या वंचित दुनियेशी जोडून घेऊया, चला वाचूया !

संपादक : प्रा. रमेश पानसे
अतिथी संपादक :
डॉ. अस्मिता हुद्दार, डॉ. वर्षा भगत

मूल्य : रु. ८० मात्र




# मुलांच्या मुक्त अभिव्यक्तीसाठी

भंडारा जिल्ह्यातील एका नावाजलेल्या शाळेत मी जवळजवळ दहा वर्षं कार्यरत होते. जिल्हा परिषदेच्या शाळेत असल्यानं बदली आलीच. हायस्कूलला प्रमोशन असल्यानं मी भंडाऱ्यापासून ६० कि.मी. वर असणाऱ्या पवनी तालुक्यातील साडेसातहजार लोकवस्तीचं 'आसगाव' निवडलं. का कोण जाणे सोयीच्या गावांचा मी कधी विचारच केला नाही. त्या टोकावर असणाऱ्या शाळेचा अभ्यास करावा, तिथल्या बोलींचा जवळून परिचय व्हावा, काही नवीन उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांस आनंद द्यावा या हेतूनं मी आसगावातील शाळेत रुजू झाले. विद्यार्थ्यांची संख्या १२०० - पाचवी ते बारावीपर्यंतच्या १९ तुकड्या. वेगवेगळ्या उपक्रमांच्या निमित्तानं मुलांशी अधिक जवळीक निर्माण होत गेली, त्यातल्या एका उपक्रमाविषयी 'FREEDOM WALL' विषयी मला आवर्जून सांगावंसं वाटतं.

खरं तर एरवी बऱ्याचशा शाळांमध्ये दिसणारं नेहमीचं चित्र म्हणजे शिक्षक व विद्यार्थी यांच्या नात्यातील / संवादातील अंतर. काही वेळेस विद्यार्थ्यांना शिक्षकांविषयी वाटणाऱ्या भीतीमुळे हे अंतर निर्माण होतं. इथंही असं अंतर मला दिसून आलं. आणि या अंतरामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारचा अबोला निर्माण झालेला होता. काहीशी तटस्थता आलेली होती. यामुळे मी अस्वस्थ झाले. शिक्षक व विद्यार्थी यांच्यात मनमोकळा संवाद घडायला हवा, वर्गात चर्चा झडायला हव्यात, वादविवाद व्हायला हवेत, प्रत्येकानं आपलं मत मांडायला हवं, मनात चाललेली आंदोलनं व्यक्त व्हायला हवीत, विचारांचे हिंदोळे उंच उंच आभाळी जायला हवेत असं वाटत होतं. त्यासाठी काय करता येईल? मनात सतत हाच एक विचार असे. आणि FREEDOM WALL ची कल्पना त्यातूनच सुचली.

आमच्या शाळेतील स्टेजच्या बाहेरील भिंतीवरील फळ्यावर मी हा उपक्रम सुरू केला. फळ्याच्या वरील भिंतीवर FREEDOM WALL असं रंगवून लिहून घेतलं. तत्पूर्वी वर्गावर्गात याबद्दल मुलांशी बोलणं केलं, आणि मग फळ्यावर रंगीत खडूनं रोज एक प्रश्न लिहायचा, त्यावर उत्तरं / प्रतिसाद मुलांनी लिहायचे याला सुरुवात झाली.

हळूहळू दिवसभरात कितीतरी उत्तरं / प्रतिसाद फळ्यावर लिहिले जाऊ लागले. मुलांच्या आयुष्यातले जिव्हाळ्याचे प्रश्न शोधून काढून ते मी लिहित असे. रोजचा प्रश्न लिहिताना फळ्याजवळ मुलांची गर्दी जमायला लागली. विषय त्यांचेच असल्यानं मुलांची उत्सुकता वाढली. शाळेच्या गेटमधून मला येताना पाहून 'मॅडम, आजचा विषय काय आहे?' असं मुलं विचारायला लागली. मला गंमत वाटायची आणि आनंदही व्हायचा.

तुम्हाला तुमच्या आईनं डब्यातून कोणता खाऊ द्यावा असं तुम्हास वाटतं? मोठ्या माणसांचं कोणतं वागणं तुम्हाला खटकतं? आईला खुश करण्यासाठी तुम्ही काय करता? शाळेत गणवेश अनिवार्य असावा की नसावा? शनिवारी शाळा सकाळी नको का? 'मी एकदा खूप रडलो' कारण... स्फोट घडवून आणणाऱ्या गुन्हेगारांना तुम्ही कोणती शिक्षा द्याल? आता आम्हीच करणार 'कसाबचा हिसाब' पण कसा? असे अनेक विषय भिंतीवर आले. या शिवाय काही महत्त्वपूर्ण घटनाही यानिमित्तानं शाळेत घडल्या.

त्यातलीच एक म्हणजे आमचा एक विद्यार्थी श्रीकांत, इयत्ता पाचवी. विकलांग आहे. अडखळत बोलतो, डोळे स्थिर नाहीत. तोंडातून लाळ येते, कधी कधी खूप हातवारे करून बोलतो. ही भिंत सुरू केल्यानंतर श्रीकांत फळ्याजवळ रेंगाळायला लागला. फळ्यावरील कोपरे तो नक्षीकाम करून सजवायला लागला. त्याने त्याला हा मंच आवडल्याचे सांगितले. शाळेतून केव्हाही घरी निघून जाणारा श्रीकांत आता शाळेतच दिवसभर रमतो. फळ्यावर स्वतःचं नाव लिहून मत नोंदवतो. तो लिहीत असला की सारे शिक्षक, मुलं 'श्रीकांत मस्त हं' 'श्रीकांत वा ! छान !' अशा प्रतिक्रिया देतात तेव्हा तो खूप आनंदी होतो. त्याच्या व्यंगाला नावं ठेवणारं, हसणारं आता माझ्या शाळेत कुणी नाही.

या भिंतीच्या निमित्तानं मुलांच्या अंतरंगात मी डोकावू शकले. या भिंतीवर लिहून मुलांच्या मनातील अनेक अमूर्त भिंती गळून तर पडल्याच शिवाय शिक्षक व विद्यार्थी यांच्यात संवादात्मक नातंही निर्माण व्हायला मदत झाली.

FREEDOM WALL च्या निमित्तानं मुलांच्या अनुभवविश्वाचा विचार करून त्यांना स्वतःच व्यक्त होण्यास संधी देणं हे महत्त्वाचं तर वाटलंच, शिवाय विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या मतांवर / प्रतिसादावर, विचारांवर शिक्षकांनी

कोणतेही ताशेरे न ओढता ते सहजगत्या स्वीकारलं हाच FREEDOM WALL मधील संवादाचा महत्त्वपूर्ण दुवा ठरला. एरवी नेहमी ‘गप्प बसा’ असं सांगणारे शिक्षक आणि फक्त शिक्षकांचीच वर्गातील बडबड ऐकणारे विद्यार्थी अशा चित्राला छेद देणारं हे चित्र यानिमित्तानं निर्माण झालं.

मुलांनाही त्यांच्या दैनंदिन आयुष्यात वेगवेगळे प्रश्न जाणवत असतात, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांविषयी त्यांच्याही मनात त्याविषयीचे पडसाद उमटत असतात. अशा वेळेस या पडसादांना, भावनांना अशा प्रकारच्या उपक्रमाच्या निमित्तानं एक वाट मोकळी करून देणं हे भावनांचा निचरा होण्यासाठी नक्कीच मदतकारक ठरतं, असं वाटतं. भिंतीवरच्या काही प्रतिक्रियांमधून हे व्यक्त होताना दिसतं.

उदा., एकदा ‘फाशी’ या विषयावर बोलताना मुलांनी ‘अन्यायाला, भ्रष्टाचाराला, वाईट प्रवृत्तींना, गरिबीला...’ अशी उत्तरं लिहिली. ज्यांचा रोजचाच झगडा दारिद्र्याशी, गरिबीशी आहे तिथं तर अशी भावना होणं स्वाभाविकच आहे. दुसऱ्या एका उदाहरणात शेजारी वेगळं भाषिक कुटुंब आहे, त्यांना मी माझी भाषा शिकवेन / त्यांची भाषा शिकेन हा साधा सोपा सहज मार्ग एका मुलानं सांगितलाय. भाषाभाषांवरून चालणाऱ्या वादाला हे उत्तर अगदी डोळ्यात अंजन घालण्यासारखं आहे.

- मुलांच्या अनुभवविश्वाची, त्यातील प्रश्नांची दखल घेणं
- मुलांना त्या प्रश्नांवर व्यक्त होण्यास संधी देणं
- मुलांनीही ते नोंदवणं (इथे मला स्वतःला जे वाटतंय ते शब्दांतून नेमकेपणानं मांडणं ही भाषिक क्षमता)
- नोंदवलेलं मत स्वीकारलं जाणं

हे चारही टप्पे शिक्षणप्रक्रियेतील संवादात नक्कीच वाढ घडवून आणणारे आहेत.

विद्यार्थ्यांना सक्रिय करण्यासाठी, व्यक्त होण्यासाठी, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी, त्या सोडवण्यासाठी FREEDOM WALL सारखा मंच सर्व शाळांमध्ये असायला हवा असं मला मनापासून वाटतं.

**स्मिता गालफाडे**
smitagalphade@gmail.com

## दिवाळी अंक २०१३



गोष्टीच्या पुस्तकात रमलेल्या बालकाचा चेहरा तुम्ही पाहिलाय? जणू या जगात नसल्यासारखी मुलं रमून गेलेली असतात. बालसाहित्यातून मुलांना काय मिळतं? एक निखळ आनंद, एक अद्भुत स्वातंत्र्यभावना, कल्पनाविश्वात भटकण्याची संधी, समोर आलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांच्या उत्तरांचे अनेकविध पर्याय, आणखी खूप काय काय. मराठी प्रांतातल्या मुलामुलींना आपल्या भाषेत हे सारं मिळायला हवं, असं आपल्याला सर्वांना वाटतं. पण आजची मराठीतल्या बालसाहित्याची परिस्थिति पाहिली तर ती या मानानं अपुरी आहे. आज नव्यानं लिहिल्या जात असलेल्या बालसाहित्यातही खूप कमतरता आहेत असं जाणवतं.

लहान मुलांसाठी लिहिताना विषय कुठले घ्यावेत, भाषा कशी असावी, वाचणाऱ्या गटाच्या वयाचा, पर्यावरणाचा संदर्भ कसा घ्यावा, चित्रांनी लेखनाचा दर्जा नेहमीच वाढतो का, शब्दभाषेच्या आकलनाला पूरक म्हणून चित्रं असावीत की चित्रं शंभर शब्दांचं आणि शब्दांपलीकडेही पोचवण्याचं काम करतात म्हणून असायलाच हवीत, यासारखे अनेक मुद्दे आपण पालक-शिक्षकांनी उपस्थित करायला हवेत. बालसाहित्य लिहिणं ही अनेकांना एकंदरीनं सोपी बाब वाटते. तशी ती प्रत्यक्षात नाही, हे आपल्याला सर्वांनाच खरं म्हणजे माहीत आहे.

भाषा समृद्ध होत जाते ती त्या भाषेतल्या शब्दांच्या आणि अर्थांच्या शक्यता जशा आणि जितक्या विस्तारत जातात तशी. साहित्यामुळे भाषा समृद्ध होण्यासाठी ‘कारण’ म्हणून आणि ‘परिणाम’ म्हणून वाचता वाचकही जाणता असायला हवा. हे घडण्यासाठी चांगलं वाचायची सवय लहानपणापासूनच लागायला हवी. त्यासाठीही चांगल्या बालसाहित्याची गरज आणि महत्त्व आहे. अनेक लहान मुलांच्या हातात ‘वाचण्याजोगं साहित्य’ म्हणून फक्त पाठ्यपुस्तकंच पडतात. त्यामुळे पाठ्यपुस्तकं तयार करतानाही ही बाब लक्षात ठेवायला हवी. शिवाय पाठ्यपुस्तकांना पूरक म्हणून अभ्यासक्रमातल्या विषयांच्या अनुरोधानं बालसाहित्याची निर्मितीही करता येईल. सर्व बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क आता मिळालेला आहे. तरीही सर्वांना वाचायला बालसाहित्य घरी उपलब्ध होणं ही अद्याप दूरची बाब आहे. ते मुबलक प्रमाणात असणं ही तर अगदीच पलीकडची गोष्ट. त्यासाठी शाळांमध्ये पेटीतील बालवाचनालयं, तसंच गावातील शहाण्या बायकांनी केलेल्या समाजकार्यातून बालवाचनालयं सुरू करता येतील, पण त्यासाठी उपलब्ध पुस्तकांमधल्या चांगल्या पुस्तकांची यादी करायला हवी. चांगली पुस्तकं स्वस्त उपलब्ध व्हावीत या दृष्टीनंही काही प्रयत्न करता येतील.

इतर देशांमध्ये चांगलं बालसाहित्य निर्माण व्हावं म्हणून पद्धतशीर प्रयत्न केले गेलेले आहेत. त्यातून भाषांतर करता येईल असं बालसाहित्य तर मिळेलच, मात्र त्यातील भाषांतर अनुरूप हवंच. शिवाय आपल्याला स्वीकारता येतील आणि स्वीकाराव्याशा वाटतील अशा काही कल्पनाही मिळवता येतील.

एखादं नवं पुस्तक कसं आहे हे सामान्यपणे वर्तमानपत्रात येणाऱ्या समीक्षेतून आपल्याला समजतं. पण बालसाहित्याची चांगली समीक्षा क्वचितच पाहायला मिळते. सामान्यत: पुस्तकाचं कथानक, लेखकाबद्दल थोडी माहिती, प्रकाशक, किंमत वगैरे तांत्रिक बाबी असतात. एका प्रकारे ती जाहिरातच असते. त्यातून ते पुस्तक चांगलं वाटलं असेल तर ते का, फार बरं नाही असं वाटलं तर ते का, हे काहीच समजत नाही. ही परिस्थितीही बदलायला हवी आहे. ह्या दृष्टीनं ठोस उपाययोजना सुचवणारा असा हा दिवाळी अंक, म्हणजे बालसाहित्याबद्दलचा सतत संग्रही ठेवावा असा एक दस्तावेजच असेल.

**पालकनीती/१६ सप्टेंबर २०१३**
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month,

**RNI No. MAH MAR 2001/4166**
Registered No. PNCW/M-50/2012-2014

तिन्ही सांजा, सखे मिळाल्या.. ह्या गाण्यावरून चर्चा सुरू होती. मिळाल्या म्हणजे काय, कुणाला मिळाल्या की एकमेकींना मिळाल्या? कुणीतरी विचारलं. तिन्ही सांजा म्हणजे संध्याकाळ हा तसा परिचयातला शब्द. पण सांज म्हणजेही संध्याकाळच; मग त्या तीन सांजा कुठल्या, असा विचार मनात आल्यावर ह्या शब्दाचं मूळ धुंडाळायला घेतलं.

सांजवण किंवा सांजवणी म्हणजे दुधाच्या धारा काढायला वापरत ती चरवी किंवा कासंडी. गाय व्यायल्यावर सुरवातीच्या काळात तीन वेळा धारा काढल्या जातात. त्या त्या वेळी अपेक्षित तेवढं दूध मिळालं किंवा पुरेसा उतारा पडला की त्याला सांज भरली असं म्हणत. तिसरी सांज भरण्याची वेळ ती तिन्हीसांजेची वेळ ! यावरूनच बहुधा सांज या शब्दाचा संध्याकाळ असाही एक अर्थ वापरात आला.

अंदाजाप्रमाणे पीक येण्याची खात्री असण्यालाही सांज बाळगणं असं म्हणत, पण हा अर्थ आता मागे पडलेला दिसतो. तसंच, 'सांज धरणं' म्हणजे सांजेला काढलेल्या दुधाचं तूप करून त्यात भिजवलेल्या वातीनं देवापुढे दिवा लावणं हाही एक मागे पडलेला वाक्प्रचार. मात्र सांजवात म्हणजे संध्याकाळी देवापुढे लावलेला दिवा, असा शब्द आजही वापरात आहे.

दुधाचं तूप म्हणजे दुधाला विरजण लावून, ते घुसळून, त्यातून निघालेलं लोणी कढवून केलेलं तूप. या तुपाला साजूक किंवा गावरान किंवा लोणकढं असे शब्द आजही वापरले जातात. त्यातल्या साजूक या शब्दाचा अर्थ बघू गेलात तर त्याचं मूळ साजा या शब्दाशी जातं. साजा म्हणजे नवा, ताजा, टवटवीत. साजूक याचा अर्थ तसाच, तयार झाल्यापासून किंवा मूळ स्थानापासून आणून फार वेळ झालेला नसल्यानं जो ताजा आणि चवदार आहे असा पदार्थ. त्यामुळे हे विशेषण फुलं, पाणी किंवा दुसऱ्या एखाद्या ताज्या खाद्यपदार्थासाठीही वापरता येतं. तसंच, गावरान म्हणजे घरगुती; घरात तयार झालेल्या पदार्थांसाठी असा शब्दप्रयोग वापरला जातो.

लोणकढं हे त्याचं एक वर्णनात्मक नाव. मात्र लोणी आणि लोणकढं या शब्दांपासून अनेक वाक्प्रचार आलेले आहेत. त्यांतल्या



'लोणी लावण्यासारख्या' काहींची चव आपल्याला परिचित आहेच. शिवाय 'लोणी खाऊन ताक देणं' हा वाक्प्रचार म्हणून फारसा वापरात नसला तरी ही कृती आणि त्याचा लक्ष्यार्थ म्हणजे त्यातून सूचित केलेला, म्हणजेच अर्थापलीकडचा अर्थ आपल्या लक्षात आलाच असेल. असो.

याशिवाय, 'लोण्याची कढी करणं' म्हणजे पुढचा मागचा विचार न करता, हात आखडता न घेता, अगदी पूर आणणं असाही एक वाक्प्रचार आहे. कढी नेहमी उरलेल्या, आंबट झालेल्या ताकाची असते, तेव्हा एरवी तिच्याबाबतीत जपून वापरायची अपेक्षा नसते. तीच पद्धत लोण्यातुपाबाबतीत सामान्यत: नसते. ह्याप्रमाणेच प्रसंग डोळ्यासमोर उभा करणारा एक वाक्प्रचार आहे, ' लोण्याच्या पुऱ्या तुपात तळणं !' अर्थ अगदी स्पष्ट आहे, कधीही न घडणाऱ्या. गोष्टीची चर्चा किंवा चिकित्सा करणं.

एखादा शांत- सौम्य स्वभावाचा माणूस अचानक संतापून कठोर- असभ्य वागू लागला तर त्याचं वर्णन 'लोण्यात दात फुटले' असं करता येतं. वरपांगी ह्याच्याच जवळचा पण अर्थानं वेगळा असलेला वाक्प्रचार आहे, लोण्यास दात फुटणं; याचा अर्थ आपण लालनपालन केलेल्या व्यक्तीनं आपल्याशी कृतघ्नपणानं वागणं असा आहे.

लोण्यावरून आता तुपाकडे म्हणजे लोणकढ्याशी जाऊ. लोणकढी याचा लक्ष्यार्थ आपल्या परिचयाचाच आहे. वेळेनुसार ठेवून दिलेली थाप याला लोणकढी असे विशेषणच नाही तर पर्यायी शब्द म्हणूनही वापरतात. पण लोणकढी दौलत म्हणजे नवीच हाती आलेली संपत्ती किंवा लोणकढं दारिद्र्य म्हणजे नुकतंच आलेले दारिद्र्य असाही वापरता येतो. नवश्रीमंत या आजच्या काळात वाढत चाललेल्या जमातीला लोणकढे श्रीमंत असं म्हणायला हवं.

कसदार म्हणजे स्निग्धांश भरपूर असलेल्या दुधाला लोणस दूध/दही म्हणतात, हेच विशेषण गायीम्हशींनाही वापरलेलं आहे. एखाद्या गोष्टीत सामावून गेलेल्या सत्त्वाला दुधातल्या लोण्याची उपमा देतात. 'देह देवाचे मंदीर' हे नाट्यगीत आपल्याला आठवत असेलच. देव देवळात नसतो, तर आपल्याच मनाशरीरात असतो, असं यात म्हटलेलं आहे. देव किंवा देवत्व म्हणजे आपल्यातला चांगुलपणा किंवा सद्भावना; असं मानलं तर आपल्या मनात नव्यानं आणि सातत्यानं देव जन्माला येतो, आणि अर्थात त्यामुळेच तो सर्वशक्तिमान वगैरे काही असण्याचं कारणच नाही, पण आपल्या जीवनाच्या आणि पर्यायानं जगाच्या कल्याणाचं ते गमक आहे असं म्हणता येईल.

**संजीवनी कुलकर्णी,**
**नीलिमा सहस्रबुद्धे**